| | |
|---|---|
| MHKO110004182017 | **नियमित दिवाणी दावा क्रमांक ५६/२०१७ मधील निशाणी क्र. २३ वरील आदेश** **( श्रीमती आक्कुबाई आप्पा नाईक विरुध्द श्री .बापू कृष्णा नाईक )** |

वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्रमांक २ सुखदेव कृष्णा नाईक यांचे विरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द होणेसाठी दाखल केला आहे.

२. वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्रमांक २ सुखदेव कृष्णा नाई क हे दिनांक १०.०५.२०१९ रोजी मयत झाले आहेत. प्रस्तुत कामी प्रतिवादी क्रमांक २ यांचे वारस रेकॉर्डवर आणणेसाठी विलंब झालेला आहे. वादी यांनी वारस रेकॉर्डवर आणणेसाठी जाणुनबुजून टाळाटाळ केलेली नाही. वादी यांना प्रतिवादी क्रमांक २ हे मयत झाल्याबाबत माहीती नव्हते. त्यामुळे त्यांचे वारस मुदतीत अभिलेखावर आणणे शक्य झाले नाही . प्रस्तुतचा अर्ज मंजूर झालेस प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट नामंजूर झालेस वादी यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. तसेच दावेचे कामी गुंतागुंत निर्माण होवून वादी यांना विनाकारण न्यायापासून वंचीत रहावे लागणार आहे.

३. प्रतिवादी क्रमांक १ ते ६ यांनी आपले म्हणणे सादर करुन योग्य ते आदेश करणेबाबत विनंती केली आहे . प्रस्तुतचा अर्ज हा मुदतीत नसल्यामुळे दिवाणी नियमावलीतील तरतूदींप्रमाणे प्रतिवादी क्रमांक २ च्या वारसांना माझ्या पूर्वीधिकारी यांनी नोटीस काढून त्यांचे म्हणणे मागवले होते. परंतू त्यांना विहीत वेळेत नोटीस मिळूनदेखिल

त्यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले नाही . सबब प्रस्तुतचा अर्ज हा त्यांचे म्हणणेशिवाय चालविणेत आला.

**४.** वादी यांच्या अर्जाचे व अभिलेखाचे अवलोकन केले. सदरचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांनी केलेले अतिक्रमण काढून घेणेकरीता दाखल केलेला आहे. वादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. दाव्याचे स्वरुप पाहता सदरच्या दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी प्रतिवादी क्रमांक २ यांचे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर येणे गरजेचे आहे. त्याकरीता प्रतिवादी क्रमांक २ यांचे विरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द होणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्रमांक २ चे कायेदशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेतलेस प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. त्याचप्रमाणे वादींनी कथन केलेले कारण हे सकृतदर्शनी संयुक्तीक वाटते . त्यामुळे वादीवर अर्जाचा खर्च बसविणे उचित व योग्य राहणार नाही. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

वादी यांचा निशाणी क्र. २३ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Digitally signed by SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Date: 2022.11.21 11:54:50 +0530

ठिकाण – पेठवडगांव		( एस.डी.शिरसाट )

दिनांक – १९/११/२०२२		दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर. पेठवडगांव